यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत मौजे घाटलाडकी, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती येथील दोन वसाहत प्रकल्पास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग,

विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग

शासन शुध्दीपत्रक : यचमु-२०१८/प्र.क्र.११९/विजाभज-१

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक : २० सप्टेंबर, २०१९.

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
क्र.यचमु-२०१८/प्र.क्र.११९/ विजाभज-१, दिनांक ०९/७/२०१९.

शासन शुध्दीपत्रक-:

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत मौजे घाटलाडकी, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथे सन २०१९-२० या आर्थिक वर्षात प्रत्येकी २० कुटुंबाच्या एका वसाहतीला मान्यता वाचा येथील शासन निर्णयान्वये देण्यात आलेली आहे.

२. या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ५ हा वगळण्यात येत असून त्याऐवजी पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा.

"५. याबाबतचा खर्च सन २०१९-२० या वित्तीय वर्षात मागणी झेडजी-३, मुख्य लेखाशिर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागास वर्ग यांचे कल्याण, ०३ मागासवर्गाचे कल्याण, (०१) (०३) विमुक्त जाती भटक्या जमाती यांच्याकरिता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना (२२२५-ई ८२१) ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागविण्यास आणि शासन निर्णय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र.गृनियो-२०१७/प्र.क्र.६०/विजाभज-१, दिनांक २४/१/२०१८ रोजीचा शासन निर्णय व दिनांक ८/१/२०१९, दिनांक ८/३/२०१९ व दिनांक ११/९/२०१९ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकामध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचनेनुसार खर्च करण्यास या शासन निर्णयाद्वारे शासनाची मंजूरी देण्यात येत आहे".

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०९२६११५९०११७२२ असा आहे. हे शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.09.26 12:00:10 +05'30'

(भा. र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय.
२) मा. राज्यमंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
४) जिल्हाधिकारी, अमरावती.
५) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे.
६) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, अमरावती.
७) सहायक आयुक्त, समाजकल्याण, अमरावती.
८) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती.
९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०) अधिदान व लेखा अधिकारी, अमरावती.
११) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.
१२) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय.
१३) निवड नस्ती (विजाभज-१).